# श्री. पांडुरंग नथ्थूजी नागपूरे

सेवक क्र. ११२६ बिनाकी ले-आऊट, आनंदनगर, नागपूर

मी बारातेरा वर्षाचा असताना मला बेचाळीस दिवसांचा विषमज्वर झाला होता. तोंडात पाणीसुध्दा जात नव्हते. मी डॉक्टरांचे आणि वैद्यांचे औषध घेऊन उपचार केला. दुःख कमी झाले परंतु पोटाचा त्रास मात्र सुरुच होता. पोट दुखले की घरगुती उपाय म्हणून पोटाखी मालीश करीत असे आणि त्यामुळे दुसराच त्रास होत असे. माझे पोट फुगू लागले. त्रास दिवसेंदिवस वाढतच होता. पोट जास्त फुगले तेव्हा प्रायव्हेट डॉक्टरांनी सांगितले की तुला लवकरात लवकर दवाखान्यात भरती करावे लागेल. तेव्हा मला दिनांक २४-१-१९७४ रोजी रात्री ११.३० वाजता मेयो हॉस्पीटलमध्ये भरती करण्यात आले. डॉक्टरांनी फोटो काढून मला ऑपरेशन रुममध्ये नेले. त्यावेळी रात्रीचे बारा वाजले होते. माझ्या वडिलांनी डॉक्टरांजवळ हट्ट धरलस की यावेळी मुलाचे ऑपरेशन करु देणार नाही. डॉक्टरांनी वडिलांना समजावून त्यांची सही घेतली. दिनांक २५-१-१९७४ रोजी सकाळी सहा वाजता दोन तासापर्यंत पोटाचे सहा इंच ऑपरेशन झाले. नंतर मला दवाखान्यातून दिनांक २८-२-१९७४ ला सुटी मिळाली.

दिनांक ४-३-७४ ला माझ्या तोंडाव्दारे जंतू पडल्यामुळे मला पुनः भरती केले. दिनांक ११-३-७४ ला दवाखान्यातून घरी परत आलो. पुनः पोटाचा त्रास सुरु झाला. दिनांक १०-९-१९७५ रोजी मला दवाखान्यात पुनः भरती करण्यात आले. औषधोपचार करुन मला दिनांक १६-९-१९७५ ला सुट्टी देण्यात आली. दिनांक ८-९-७६ ला आम्ही घरचे लोक मिळून गणपतीचा तमाशा पाहण्यास सीताबर्डीला बसने जात असतानाच रस्त्यातच माझी प्रकृती बिघडली. मला माझ्या भावाने रिक्षातुन घरी आणले. डॉक्टर, वैद्य वगैरेंचा उपचार केला. आराम मिळाला नाही. त्याच रात्री दोन वाजता पुन्हा मला दवाखान्यात भरती करण्यात आले. डॉक्टरांनी औषधोपचार चालू केला. पोटाचा त्रास खूप वाढला. नंतर फोटो काढून दिनांक ९-९-७६ रोजी रात्री नऊ वाजता जुन्याच ऑपरेशनच्या जागी ऑपरेशन करण्यात आले. दिनांक २०-९-७६ रोजी मला सुट्टी मिळाली. तरीपण पोटाचा त्रास कमी झाला नाही.

दिनांक १६-७-१९७९ ला एस.एस.सी. ची परिक्षा पास केल्यानंतर तीच परिस्थिती निर्माण झाली. डॉक्टरांचे व वैद्यांचे उपचार घरीच केले. तरीही मुळीच

आराम पडला नाही. दिवसेंदिवस प्रकृती चिंताजनक होऊ लागली. दिनांक १९-१२-७९ रोजी मला दवाखान्यात भरती करण्यात आले. भरती करीत असताना पोट जास्त फुगू लागले. तेव्हा घरच्या सर्व लोकांच्या डोळ्यात अश्रू आणि निराशा दिसत होती. माझ्या वाचण्याबद्दल कोणालाच आशा नव्हती.

माझी चिंताजनक प्रकृती पाहून माझे भाऊ श्री. जगन्नाथ नागपूर हे एका भगवंताला मानणारे सेवक श्री. सुरेश बारापात्रे यांच्या घरी गेले. त्याने माझ्या प्रकृतीची माहिती त्यांना दिली. बाबांच्या मार्गावर येण्याची इच्छा आहे असे सांगून आपण मला महानत्यागी बाबा जुमदेवजींकडे घेऊन चला म्हणून त्यांना विनंती केली. दुसऱ्या दिवशी सकाळी दोघे मिळून बाबांकडे गेलो. बाबा स्नान करुन पुजेला बसले होते. पुजा झाल्यावर बाबांनी विचारपूस केली. श्री. सुरेश बारापात्रे यांनी बाबांना माझ्या प्रकृतीबद्दलजी सविस्तर पणे माहिती दिली. डॉक्टरांनी पुन्हा तिसऱ्यांदा ह्या मुलाचे ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले असून त्यांची ऑपरेशन करुन घेण्याची इच्छा नाही. आपल्या मार्गावर येण्याची इच्छा असून त्याच उद्देशाने ते आपल्याकडे आले आहेत. वरील वाक्य ऐकून श्री. सुरेश बारापात्रे यांना बाबांनी आदेश दिला की, तुम्ही त्यांच्यासोबत जा व एक तासात तीन वेळा तीर्थ करुन द्या. त्याचप्रमाणे सेवक व माझे भाऊ दवाखान्यात आले. माझी दवाखान्यात अशी विचित्र परिस्थिती होती की मला चार दिवसांपासुन एकसारख्या ग्लुकोजच्या बाटल्या चालू होत्या. रोज मला ४-५ इंजेक्शन्स देत होते. औषधोपचाराला मी कंटाळून गेलो होतो. मी दुःखामुळे उठून बसू शकत नव्हतो. नाकाला व हाताळा नळी असल्यामुळे मी बोलु शकत नव्हतो.

बाबा हनुमानजी या शब्दात किती शक्ती आहे हे मी आपल्या सत्य अनुभवावरुन सांगत आहे. बाबांच्या आदेशाप्रमाणे मला पहिले तीर्थ दिले तेव्हा मी बाबा हनुमानजी या नावाचा मनात उच्चार करुन तीर्थ घेतले. काही वेळाने मी उठून बसू शकलो. दुसरे तीर्थ घेतल्यावर माझ्या हाताला असलेली नळी बंद पडल्यामुळे डॉक्टरांनी हाताची नळी काढली आणि तिसरे तीर्थ घेतल्यावर माझ्या नाकाला लावलेली नळी डॉक्टरांनी काढून घेतली. त्यामुळे मी बोलू शकलो व पन्नास फुट अंतरावर असलेल्या लघवीघरात मी कोणताही आधार न घेता एकटाच गेलो. मला तेव्हा परमेश्वराचाच आधार होता. अशाप्रकारे मला बाबा हनुमानजी या नावातील शक्ती दिसून आली व नंतर डॉक्टरांनी मला लवकरच दि. २८-१२-७९ ला सुटी दिली.

नंतर आम्ही बेचाळीस दिवसाचे त्यागाचे कार्य घेण्याकरिता दिनांक १-४-८० रोजी बाबांकडे गेलो असता बाबांनी दि. २-४-८० पासमन बेचाळीस दिवसांचे त्यागाचे कार्य सुरु करण्यास परवानगी दिली. बेचाळीस दिवसांच्या कार्यात परिपूर्ण समाधान मिळाले. कोणत्याही प्रकारचा औषधोपचार घेतला नाही आणि दि. १५-५-८० रोजी हवनकार्य करुन समाप्ती केली.

घरी माझा फोटो फ्रेम बनविण्याचा धंदा होता. ते काम मी करीत होतो. दि. १०-१२-८१ ला सकाळी १० वाजता अचानक माझे पोट दुखने सुरु झाले. डॉक्टरी उपचार केला परंतु आराम न होता दुखणे जास्तच वाढले. त्यामुळे त्याच रात्री आठ वाजता मी दवाखान्यात भरती झालो. डॉक्टरांनी दुखण्यावर उपचार केले पण दुखणे सारखे वाढतच होते. तेव्हा डॉक्टरांनी फोटो काढून ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले. ही घटना माझ्या भावाने बाबांकडे येऊन सांगितली. बाबांनी मार्गदर्शन करुन सांगितले. आता यापुढे दुखणे पुर्णपणे नाहीसे होईल. कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही. बाबांच्या मार्गदर्शनाने मला ऑपरेशनची आवश्यकता पडली नाही व माझे पोटाचे दुखणे आपोआप नाहीसे होऊन मला दवाखान्यातून दि. २८-१२-८१ रोजी सुट्टी मिळाली तेव्हापासून आजपर्यंत मला कोणत्याच प्रकारचे पोटाचे दुखणे झालेले नाही. मी महानत्यागी बाबा जुमदेवजींच्या निष्काम सेवेला आयुष्यात कधीही विसरणार नाही असे सत्य वचन देतो.

* * * * *